दिनांक .२८/०७/२०१९

**प्रेसनोट**

**<u>कात्रज परिसरात गांजाची मोठया प्रमाणात तस्करी करणारा अटकेत</u>**

**<u>भारती विद्यापिठ पोलिस ठाणेची कामगिरी</u>**

दि.२७/०७/२०१९ रोजी पो उप निरीक्षक सुबराव लाड,पो हवा ४४१७ बढे, पो.ना.५०३ कुंदन शिंदे, पो.ना. ६४९८ सर्फराज देशमुख, पो ना. ६६३१ पवार ,पो. शिं. ९९३६ राहुल तांबे, पो.शि.८४४२ चिचंकर, पो.शि८४३५ मंडलीक, पो.शि.८२०१ अभिजीत जाधव, व पो.शि.८२९८ रत्नपारखी असे मांगडेवाडी, गुजरवाडी भागात खाजगी वाहनाने पेट्रोलिंग करत असताना पेट्रोलिंग करत करत मस्तान हॉटेलच्या जवळ, जाधवनगर येथे आले असता. एक ग्रे रंगाचे जर्कीग घातलेला इसम हा त्याच्या पाठीवर काळे रंगाची सॅक घेवुन संशयीत रित्या दिसला. सदर इसमास पोलींसाची चाहुल लागताच तो पोलीसांना पाहुन तो पळु लागल्याने त्याला थोडयाच अतंराव पो शि कुदंन शिंदे व राहुल तांबे व वरील पोलीस स्टाफ यांच्या मदतीने पाठलाग करुन पकडुन त्याला त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव धंनजय रामा जाधव,वय २५ वर्षे, रा. साळुखे यांच्या भारतनगर येथील खोलीत, निंबाळकरवस्ती, कात्रज पुणे मुळ रा.सिध्दनाथवाडी, ता.वाई, जि. सातारा असे सांगितले. त्याच्या सॅग मध्ये काहीतरी संशयास्पद वस्तू असल्याचा संशय आल्याने सॅकची तपासणी केली असता, त्याच्या सॅक मध्ये खाकी रंगाच्या चिकटपटीने सिटकविलेले तीन बॉक्स मिळुन आले, तसेच त्याच्या खाली निळया रंगाची कापडी लहान आकाराची पिशवी व त्याच्या आत हिरवा सुका-ओला बोंडासह पाला दिसला, त्याचा वास घेऊन पाहिला असता, उग्र असा गांजाचा वास येऊ लागला. सदरच्या पिशवीमध्ये गांजा हा अंमली पदार्थ असल्याचे दिसल्याने लागलीच पोलीस निरीक्षक गुन्हे श्री विष्णु ताम्हाणे यांना तपास पथकाने कळवुन त्याठिकाणी बोलावुन घेवुन त्यांनी खात्री करुन त्यांनी आरोपीच्या ताब्यातुन ०७ किलो ३९६ ग्रॅम वजनाचा गांजा, रेडमी कंपनीचा मोबाईल व रोख १५००/- रु असा एकुण १,१९,४४०/- चा माल जप्त करण्यात आला आहे.

दि.२७/०७/२०१९ रोजी रात्रौ २१.००वा सुमारास मस्ताना हॉटेलच्या समोर, जाधवनगर, कात्रज पुणे हा सार्वजनिक ठिकाणी इसम नामे ज्ञानेश्वर उर्फ धंनजय रामा जाधव, वय २५ वर्षे, रा. साळुखे यांच्या भारतनगर येथील खोलीत, निंबाळकरवस्ती, कात्रज पुणे मुळ रा. सिध्दनाथवाडी, ता.वाई, जि. सातारा हा त्यांचे ताब्यात कि. रु. १,१०,९४०/- चा ०७ किलो ३९६ ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या विक्रीकरीता जवळ बाळगताना मिळुन आला, म्हणुन त्याचे विरुध्द एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २० (ब) (ii) (ब) प्रमाणे पो हवा ४४१७ बढे यांनी फिर्याद दिली आहे गुन्हयाचा तपास पो उप निरीक्षक सुबराव लाड हे करीत आहेत.

**सदरची कारवाई मा.श्री श्रीकांत तरवडे सो अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, मा.श्री सरदेशपांडे सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.एम एम पाटील सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली व विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), यांच्या दिमतीत तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री. सुबराव लाड ,पोलीस हवालदार कृष्णा बढे, कुदंन शिंदे, सर्फराज देशमुख,राहुल तांबे, गणेश चिंचकर, सचिन पवार, महेश मंडलिक, अभिजित जाधव, आणि अभिजित रत्नपारखी यांचे पथकाने कारवाई केलेली आहे.**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे

पोलीस निरीक्षक (गुन्हे)
भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे